# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.एमडीएफ/ओडी/727/जन दि.10.7.2017

## परिपत्रक

विषय - सार्वजनिक गणेशोत्सव - 2017

संदर्भ - 1)परिपत्रक क्र.एमडीएफ/ओडी/418/जन दि.12.5.2017
2)परिपत्रक क्र.एमडीएफ/ओडी/664/जन दि.3.6.2017

(I) उपरोक्त नमूद परिपत्रकान्वये सार्वजनिक गणेशोत्सव - 2017 संबंधित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये क्र.7 वर खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले होते.

**7. "सार्वजनिक जागेवर मूर्तीकारांना/मंडपांना परवानगी देता येणार नाही. खाजगी जागेवर अशा प्रकारची परवानगी मागणारा मूर्तीकार हा पारंपारिक मूर्तीकार असणे अनिवार्य असेल व त्यास दोन्ही उपनगरांमधून कोणत्याही एकाच ठिकाणी परवानगी देता येईल."**

उपरोक्त सूचना खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत असून त्याप्रमाणे विभागीय कार्यालयांनी ऊचित कार्यवाही करावी.

**7. "सार्वजनिक जागेवर मूर्तीकार/मंडपांसाठी नव्याने अर्ज आल्यास विभागीय कार्यालयाकडून परिपत्रक क्र. एमडीएफ/ओडी/418/जन दि.12.5.2017 मधील तरतुदीप्रमाणे तपासणी करण्यात यावी. स्थानिक पोलिस स्टेशन, वाहतुक पोलिस यांचे `ना हरकत प्रमाणपत्र ' प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त नमूद परिपत्रकातील तरतूदी विचारात घेऊन परिमंडळीय उपायुक्त यांच्या मान्यतेनंतर ऊचित कार्यवाही करावी. खाजगी जागेवर अशाप्रकारची परवानगी मागणारा मूर्तीकार हा पारंपारिक मूर्तीकार असणे अनिवार्य असेल व त्यास दोन्ही उपनगरांमधून कोणत्याही एकाच ठिकाणी परवानगी देता येईल."**

(II) **मूर्तीकार / गणेश मंडपांना परवानगीसाठी `एक खिडकी योजना ' चालू करणेबाबत.**

मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या आदेशानुसार परिपत्रक क्र. एमडीएफ/ओडी/418/जन दि.12.5.2017 निर्गमित करुन रस्ते/फूटपाथवर उत्सव साजरे करणेकामी तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात येणा-या मंडपांना द्यावयाच्या परवानगीबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. सर्व विभागीय कार्यालयांनी सदर परिपत्रकात दिलेल्या सूचनांचे पालन करुन विविध उत्सव साजरे करताना तात्पुरत्या स्वरुपात मंडपांना परवानगी देण्यात यावी.

34

गणेशोत्सव / नवरोत्रोत्सव परवानगी कामांकरिता प्रत्येक विभागीय कार्यालयात एक कनिष्ठ अभियंता दर्जाच्या अधिका-याची नेमणूक विभागीय सहा.आयुक्त यांच्याकडून करण्यात यावी. सदर अधिका-याचे नाव, कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक, उपलब्धतेची वेळ याबाबतची माहिती विभागीय कार्यालयात दर्शनी भागात प्रसारित करण्यात यावी. गणेशमंडळांच्या प्रतिनिधींकडून परवानगीसाठी आलेले अर्ज संबंधित अधिका-याने प्राप्त करुन घ्यावेत. विभागीय सहा.आयुक्त यांनी, स्थानिक पोलिस कार्यालय व वाहतुक पोलिस कार्यालय यांच्याशी संपर्क साधून त्यांचे प्रतिनिधी एका विशिष्ट वेळेत नागरी सुविधा केंद्रात उपलब्ध राहून, परवानगीसाठी आलेल्या अर्जांवर लवकरात लवकर कार्यवाही करावी व मंडळाच्या प्रतिनिधींना अनुज्ञेयतेप्रमाणे शक्य तितक्या शीघ्रतेने परवानगी मिळणेकामी सहकार्य करावे.

सदर परिपत्रकातील इतर मार्गदर्शक सूचनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सही/-10.7.17 सही/-11.7.17
उपायुक्त (परि-2) अति.आयुक्त (पूर्व उपनगरे)

प्रत

1)अति.आयुक्त(प्रकल्प यांचे स्वीय चिटणीस
2) अति.आयुक्त(शहर) यांचे स्वीय चिटणीस
3) अति.आयुक्त(पूर्व उपनगरे)यांचे स्वीय चिटणीस
4) अति.आयुक्त(पश्चिम उपनगरे) यांचे स्वीय चिटणीस
5) मा.मनपा आयुक्त यांचे स्वीय चिटणीस
6)अनुज्ञापन अधिक्षक
7)सहाय्यक आयुक्त _________ विभाग
8)उपायुक्त (परि-1, 3, 4, 5, 6, 7)

आपल्या माहितीकरिता.

म आपटे 12/7/17.

उपायुक्त (परि-2) यांचे प्रशासकीय अधिकारी